**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १२८/२०२१** (सदिच्छा निलेश वेंगुर्लेकर. व.३ वि. निलेश वि.वेंगुर्लेकर) मधील नि. ४ वरील आदेश

......

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे कथन की, अर्जदार क्र.१ व सामनेवाला यांचा विवाह हिंदु विवाह कायद्याप्रमाणे दिनांक २ ३/०४/२०१३ रोजी दोन्ही घरच्या संमत्तीने झालेला असून लग्नानंतर अर्जदार क्र .१ ही सामनेवाला याचे घरी नांदण्यासाठी गेली. मे २०१४ मध्ये अर्जदार क्र.१, सामनेवाला व अर्जदार क्र. १ ची सासू असे तिघेही सामनेवाला रहात असलेल्या मुंबई येथील खोलीवर गेले. अर्जदार क्र.१ ही मुंबईला असताना क्षुल्लक कारणावरुन सामनेवाला याने अर्जदार क्र.१ हिला शिवीगाळ केली व खोलीतून बाहेर काढले . त्यावेळी अर्जदार क्र.१ हिची सासू अर्जदार क्र.१ हिस सावंतवाडी येथे घेवून आली व कसाल येथे नेवून उलट अर्जदार क्र.१ हिच्याच चुका सांगू लागली. लोक काय म्हणतील या भितीने अर्जदार क्र .१ ही सावंतवाडी येथे गेली , त्यावेळी सामनेवाला हा सावंतवाडी येथे आलेला होता.

३. अर्जदाराने पुढे असेही कथन केले की , त्यानंतर माहे जुलै–२०१४ मध्ये पंधरा दिवसांची सुट्टी काढून अर्जदार ही मुंबई येथे गेली. लग्नाच्या ठरावात ठाणे येथे बदली करुन दोघांनी एकत्र रहावयाचे असे ठरलेले असताना सामनेवाला याने त्यादृष्टीने प्रयत्न केला नाही . त्यानंतर सामनेवाला याने अर्जदार क्र. १ हिला सांगितले की, ‘लग्नासाठी मी कर्ज घेतले आहे, त्यामुळे तू कर्ज काढून सदर रक्कम मला दे’ सदर कर्ज फेडण्यासाठी अर्जदार क्र . १ हिचेवर कर्ज घेण्यासाठी सामनेवाला क्र. १ व तिची सासू यानी दबाव टाकला. शेवटी आपल्या संसाराचा विचार करुन अर्जदार क्र. १ हिने बँकेतून कर्ज काढले व सदर कर्ज फेडण्यासाठी पैसे दिले . त्यावेळी अर्जदार ही तीन महिन्यांची

गरोदर होती. त्यानंतर पुन्हा जमिनीच्या केससाठी म्हणून सासूने अर्जदार क्र.१ हिचेकडून पैसे घेतले. तसेच सामनेवाला याने सावंतवाडी ये थे प्लॅ ट घेतला, त्या प्लॅटचेही हप्ते अर्जदार क्र. १ हिचेकडून भरणा करुन घेतले. त्याचप्रमाणे सासूच्या आजारपणासाठी दिड लाख रुपये अर्जदार क्र.१ हिने दागिने गहाण ठेवून दिलेले होते. ती रक्कम अर्जदार क्र.१ हिने आपले पगारातून व्याजासकट भरणा केलेली आहे. त्याचप्रमाणे सासूने सावंतवाडीतील इमला क्र.२२० च्या नवीन बांधकामासाठी सुध्दा अर्जदार क्र. १ हिचेकडून पैसे घेतलेले आहेत.

४. अर्जदाराचे पुढे असेही कथन आहे की, या विवाह बंधनातून अर्जदार क्र. २ व ३ यांचा जन्म झालेला आहे. परंतु सामनेवाला याने त्यांचे पानपोषणाची जबाबदारी कधीही उचललेली नाही. बाळंतपणापर्यंतचा सर्व खर्च अजदार क्र.१ हिने स्वतःच केलेला आहे. अर्जदार क्र.२ हिचा जन्म झाल्यानंतर मुलगी झाली म्हणून अर्जदार क्र.१ हिला जबरदस्तीने माहेरी पाठविले. त्यानंतर अर्जदार क्र.३ हिचा जन्म झाला. दुसरीही मुलगी झाल्यामुळे सामनेवाला तसेच सामनेवाला याचे आई व बहिण त्रास देवू लागले. अर्जदार क्र. २ व ३ यांचे पालनपोषणाबाबत विचारले असता ' मी तुला अलिखित घटस्फोट दिलेला आहे, मला त्याबद्दल काहीही विचारायचे नाही,' असे सांगितले. माहे मे-२०१८ मध्ये अर्जदार क्र.१ ही मुलींना घेवून मुंबईला गेली असता सामनेवाला याने त्यांना घरात न घेता लॉक करुन निघून गेला व दोन तासांनी घरी आला. सामनेवाला याने मुलीना बापाचे प्रेम दिलेले नाही तसेच पालनपोषणासाठी कोणताही खर्च केला नाही.

५. लग्न झाल्यापासून सामनेवाला याचेकडून कोणतेही सुख मिळकत नसल्याने तसेच अर्जदार क्र. २ व ३ यांची पालनपोषणाची जबाबदारी उचलली नसल्याने अर्जदार क्र.१ हिने शेवटी नाईलाजास्तव कौटुंबिक सल्ला केंद्र येथे अर्ज दाखल केला. परंतु सामनेवाल्याने आपल्या आईच्या आजारपणाचे कारण सांगून हजर राहिला नाही. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिने महिला अत्याचार

तक्रार निवारण कक्ष येथे अर्ज दिला असता त्याने 'मला नांदावयाचे नाही' असे सांगितले. लग्न झाल्यापासून अर्जदार क्र. १ हिने मोठया प्रमाणावर कर्ज काढल्याने चिी आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झालेली आहे. सामनेवाला हा केंद्रीय सरकारी कर्मारी असून कॉईन डिझाईनर म्हणून काम करतो. त्याला दरमहा रक्कम रु.६०,०००/- इतका पगर असून सावंतवाडीतीली घराचे भाडे रक्कम रु.४०,०००/-, जादा कामाचे दरमहा पैसे मिळतात , असे एकूण महिना रक्कम रु. ७५,०००/- मिळतात. त्यामुळै सामनेवाला याचेकडून मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत अर्जदार क्र. २ व ३ यांचे शिक्षण व पालनपोषणासाठी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- दरमहा अंतरिम पोटगी द्यावी , यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

६. सामनेवाला याने नि. १२ कडे आपले लेखी म्हणणे सादर करुन अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. लग्नानंतर सामनेवाला हा अर्जदार क्र.१ सोबत चांगला वागत असून त्याने अर्जदार हिला कधीच अमानुष वागणूक दिली नाही. याउलट अर्जदार हिने सामनेवाला याला नेहमी अपमानास्पद वागणूक देवून शिवीगाळ व मारहाण करते. सामनेवाला याने अर्जदार हिची बदली ठाणे येथे होण्यासाठी प्रयत्न केले . परंतु तरीदेखील अर्जदाराची बदली करुन मिळाली नाही. सामनेवाला याने अर्जदार हिचेकडे कधीच पैशाची मागणी केलेली नाही किंवा अर्जदाराला कोणत्याही प्रकारची धमकी दिलेली नाही . सामनेवाला याने लग्नाकरीता रक्कम रु. ५,००,०००/- कर्ज काढलेले होते. सदर कर्जाचे हप्ते सामनेवाला हाच भरत होता . परंतु अर्जदार हिने आपण लवकरात लवकर कर्ज फेड करु या आणि आपण प्लॅट घेवू या असे म्हणून तिने आपल्या परिपक्व झालेल्या एफडीचे रु . २,००,०००/- सामनेवाल्याचा मावशीचा नवरा प्रकाश चव्हाण यांचे कर्ज स्वखुशीने फेड केले . सामनेवाला याने अर्जदार हिचेवर कधीही कोणत्याही प्रकारची जबरदस्ती केलेली नाही . तसेच सामनेवाला याचे कामावर ओव्हर टाईम बंद झाल्यामुळे प्लॅटचे हप्ते भरणे

शक्य नव्हते, त्यावेळी अर्जदाराने स्वेच्छेने दिनांक २९/०९/२०१४ रोजी रक्कम रु. ३३,०००/– व १३/०२/२०१७ रोजी रक्कम रु. ३३,०००/– असे कर्जाचे हप्ते भरणा केलेले आहेत व उर्वरित कर्ज सामनेवाला हा भरणा करीत आहे. तसेच सामनेवाला याचे आईस हार्ट अॅटॅक आला त्यावेळी तिचे आजारपणाचा सर्व खर्च सामनेवाला व त्याच्या बहिणीने केलेला आहे.

७. अर्जदार हिला सामनेवाला याची व संसाराची काळजी नव्हती . अर्जदार ही नोकरीच्या निमित्ताने कायम माहेरीच राहिली. तसेच अर्जदार ही स्वतः शिक्षिका असून तिने आपल्या मुलीच्या शिक्षणाबाबत कायम दुर्लक्ष केले. सामनेवाला याने पाटणकर इंग्लीश स्कूल मध्ये रक्कम रु. पाच हजार भरुन मुलीचे अॅडमिशन करुन घेतले व मुलीना सोडायला व आणायला गाडी लावली. सामनेवाला हे आपल्या मुलींचे संगोपण करण्यास तयार आहेत. परंतु अर्जदार ही सामनेवाला याना मुलीना भेटण्यास देखील देत नाही . सामनेवाला याने अर्जदार हिचेशी समझोता करुन तिला नांदावयास नेण्याचा प्रयत्न केला, परंतु अर्जदार हिने स्वतंत्र खोली घेवून स्वतंत्र रहाण्याची अट ठेवून सामनेवाला याचेसोबत येण्यास नकार दिला.

८. तसेच सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की , सामनेवाला याला जरी रु .६०,०००/– पगार असला तरी मंगळसूत्रासाठी घेतलेल्या कर्जाचा हप्ता रु. १०,०००/– व इतर वजावटी होवून रु. ४०,०००/– एवढाच पगार हातात येतो. त्यातून रु १५,०००/– घर कर्ज व आईच्या आजारपणासाठी रु. १०,०००/– एवढा दरमहा खर्च आहे . त्यामुळे सामनेवाला याचे हातात रु.१५,०००/– एवढे रहात असून त्यांना प्रवासखर्च दरमहा रु. ५,०००/– व वैयक्तिक खर्च असतो. त्यामुळे अर्जदार यांना स्वतंत्र पोटगी देणे शक्य होणारे नाही. याउलट, अर्जदार या प्राथमिक शिक्षिका असून तिला रक्कम रु.४०,०००/– एवढा पगार आहे. त्यामुळे ती आर्थिक दृष्टया सबळ असून सामनेवाल्यावर उपजिवीकेकरीता अवलंबून नाही. सामनेवाला

याने अर्जदार हिला नांदविण्यासाठी बरेच प्रयत्न केले . परंतु अर्जदार हिने नांदावयास नकार देवून ती स्वतःहून सामनेवाला यांचेपासून वेगळी रहात आहे. त्यामुळे तिला सामनेवाला याचेकडे पोटगी मागणेचा हक्क प्राप्त होत नाही . सामनेवाला हे अर्जदार क्र. २ व ३ यांचा शिक्षण व पालनपोषणाचा खर्च करणेस सक्षम आहे. त्यामुळे अर्जदार क्र. २ व ३ यांचा ताबा दिल्यास सामनेवाला त्यांचा सांभाळ करण्यास तयार आहेत. अर्जदार क्र.१ हिने कोणतेही संयुक्तिक कारण नसताना सदरचा अर्ज दाखल केला आहे. तरी अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती सामनेवाला क्र.१ याने केली आहे.

९. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्रीमती एस .एस. रांगणेकर–सावंत यांचा युक्तीवाद ऐकला. तर सामनेवाला यांच्यातर्फे विधिज्ञ श्रीमती जी.एस.देसाई यांचा युक्तीवाद ऐकला.

१०. दिनांक २३/०४/२०१४ रोजी अर्जदार क्र.१ व सामनेवाला यांचा हिंदु धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे विवाह झाला आहे ही बाब दोन्ही पक्षांना मान्य आहे. अर्जदार यांची अर्जातील कथने आणि सामनेवाला याच्या लेखी म्हणणे (नि. १२) मधील कथने यांचा साकल्याने विचार करता दोन्ही पक्षांमध्ये वाद आहेत, असे प्रथमदर्शनी दिसत आहे.

११. अर्जदार हिने तिचे अर्जाचे पुष्टयर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे . अर्जदार क्र.१ हिचे कथनानुसार, अर्जदार क्र.२ हिचा जन्म झाल्यानंतर मुलगी झाली म्हणून अर्जदार क्र.१ हिला जबरदस्तीने माहेरी पाठविले . त्यानंतर अर्जदार क्र.३ ही दुसरी मुलगी झाल्यामुळे सामनेवाला , त्याची आई व बहिण त्रास देवू लागले. अर्जदार क्र. २ व ३ यांचे पालनपोषणाबाबत सामनेवाला यास विचारले असता 'मी तुला अलिखित घटस्फोट दिलेला आहे , मला त्याबद्दल काही विचारायचे नाही,' असे सांगितले. सामनेवाला हा अर्जदार क्र.२ व ३ च्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी उचलत नसल्याने अर्जदार क्र .१ हिने

कौटूंबिक सल्ला केंद्र येथे अर्ज दाखल केला. परंतु सामनेवाला याने पोलीसांत तक्रार केली असे कारण देवून अर्जदार क्र. १ हिला घरातून हाकलून दिले. अर्जदार क्र.१ ही सावंतवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत नोकरी करत होती. रहाण्याची सोय नसल्याने अर्जदार ही नाईलाजास्तव माहेरी आली . लग्न झाल्यापासून अर्जदार क्र. १ हिने मोठया प्रमाणावर कर्ज काढल्याने तिची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झालेली आहे. कर्जाचे हप्ते व मुलांचे पालनपोषण करणे तसेच त्यांची आजारपणे यामध्ये तिला तिचा पगार पुरत नाही . सामनेवाला यांनी अर्जदार क्र. २ व ३ यांची पालन पोषणाची व्यवस्था केलेली नाही.

१२. सामनेवालातर्फे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदार क्र.१ ही शाळेमध्ये प्राथमिक शिक्षिका असून तिला दरमला रु.६०,०००/- इतका पगार आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ही स्वतःचे व अर्जदार क्र. २ व ३ यांचे पालनपोषण करण्यास सक्षम आहे. अर्जदार ही कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय सामनेवाला याचेपासून विभक्त रहात आहे. त्यामुळे तिला पोटगी मागण्याचा अधिकार नाही. अर्जदारातर्फे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, लग्न झाल्यापासून घरगुती कारणासाठी तिने मोठया प्रमाणावर कर्ज काढल्याने तिची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झालेली आहे . कर्जाचे हप्ते व मुलांचे पालनपोषण करणे तसेच त्यांची आजारपणे यामध्ये तिला तिचा पगार पुरत नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जात अर्जदार हिने अर्जदार क्र.२ व ३ यांचे शिक्षण व पालनपोषणासाठी पोटगीची मागणी केलेली आहे.

१३. अर्जदार यांच्या अभिकथनानुसार सामनेवाला हा केंद्रिय सरकारी कर्मचारी असून कॉईन डिझायनर म्हणून काम करतो. त्याला दरमहा रक्कम रु. ६०,०००/- इतका पगार असून जादा कामाचे पैसे मिळून एकूण महिना रक्कम रु.७५,०००/- एवढा पगार मिळतो. तसेच सावंतवाडी येथील घराचे भाडे रक्कम रु. ४०,०००/- मिळते. याउलट, सामनेवाला याचे

अभिकथनानुसार सामनेवाला याला जरी रु.६०,०००/- पगार असला तरी मंगळसूत्रासाठी घेतलेल्या कर्जाचा हप्ता रु. १०,०००/- व इतर वजावटी होवून रु. ४०,०००/- एवढाच पगार हातात येतो. त्यातून रु १५,०००/- घर कर्ज व आईच्या आजारपणासाठी रु. १०,०००/- एवढा दरमहा खर्च आहे. त्यामुळे सामनेवाला याचे हातात रु.१५,०००/- एवढे रहात असून त्यांना प्रवासखर्च दरमहा रु. ५,०००/- व वैयक्तिक खर्च असतो. त्यामुळे अर्जदार यांना स्वतंत्र पोटगी देणे शक्य होणारे नाही.

१४. मा. सर्वोच्च न्यायालयाने ***रजनीश वि. नेहा व इतर, क्रिमीनल अपील नं. ७३०/२०२०*** याकामी दिलेल्या निर्देषानुसार दोन्ही पक्षांनी आपले मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र नि. १६ व नि. २२ कडे दाखल केले आहे.

१५. नि. २२ कडे दाखल केलेले सामनेवाला याचे मालमत्ता व दायित्वाबाबतचे प्रतिज्ञापत्र पहाता , त्याने तो नोकरी करीत असल्याचे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये सामनेवाला याने त्याचे मासिक वेतन रुपये ३५,०००/- असल्याचे नमूद केले आहे. तसेच त्याचे गृह कर्जाचा मासिक हप्ता रक्कम रु.१५,०००/- व चौदा तोळे मंगळसूत्रासाठी घेतलेले रक्कम रु. ६,००,०००/- कर्जाचा मासिक हप्ता रक्कम रु.१०,०००/- असल्याचे नमूद आहे. तसेच सामनेवाला यांच्या आईचा औषधपाण्याचा खर्च प्रतिमहिना रु.१२,०००/- असल्याचे नमूद आहे. परंतु सामनेवाला याचे म्हणणे नि.१२ पहाता त्यामध्ये त्याने त्याचा पगार रक्कम रु. ६०,०००/- असल्याचे मान्य केले आहे व त्यातून मंगळसूत्रासाठी घेतलेल्या कर्जाचा हप्ता रु.१०,०००/- व इतर वजावटी होवून रु.४०,०००/- एवढा पगार हातात येतो, असे कथन केलेले आहे . सामनेवाला याने सदर प्रतिज्ञापत्रासोबत त्याचा पगाराचा दाखला हजर केलेला नाही . त्यामुळे सामनेवाल्याचा निश्चित उत्पन्नाबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर नाही.

तसेच सामनेवाला याचे उत्पन्नाबाबत त्याचे म्हणणे (नि. १२) व मालमत्ता दायित्वाचे प्रतिज्ञापत्र (नि. २२) मध्ये तफावत दिसून येते.

१६. याउलट अर्जदार हिने नि. १६ कडे आपले मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये तिने तिचे मासिक पगार रु. ६०,६६३/– असून वजावटी होवून रक्कम रु.२६,१४२/– मिळत असल्याचे नमूद आहे. तसेच तिने गृहकर्ज रक्कम रु. १८,००,०००/– व वैयक्तिक कर्ज रु. ६,००,०००/– व २,९०,०००/– घेतल्याचे नमूद आहे. अर्जदार हिने तिचे पगाराचा दाखला हजर केला असून त्यामध्ये तिचा मासिक पगार रु.६१,९१३/– असा नमूद असून वजावट रु.३५,७७१/– होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर वजावट वजा रोख रक्कम रु. २६,१४२/– इतके हाती मिळतात, असे दिसून येते.

१७. वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार क्र.१ व सामनेवाला यांचा विवाह झालेबाबतची बाब नाकारलेली नाही. तसेच अर्जदार क्र.२ व ३ या दोघी अर्जदार क्र. १ व सामनेवाला यांच्या मुली आहेत, ही बाब देखील दोघाना मान्य आहे. अशापरिस्थितीत, अर्जदार क्र. २ व ३ यांच्या शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी ही अर्जदार क्र. १ व सामनेवाला या दोघांचीही आहे. सध्या अर्जदार क्र. २ व ३ या अर्जदार क्र.१ यांचेसोबत रहात असून त्यांचे शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी अर्जदार क्र.१ हया पार पाडत आहेत, असे दिसून येत आहे. सामनेवाला यांनी अर्जदार क्र. २ व ३ यांचे शिक्षण, पालनपोषण, कपडालत्ता, औषधपाणी या बाबत कोणती तरतूद केली याबाबत सामनेवाला नं. १ याने त्याचे म्हणणे (नि. १२) मध्ये काहीही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे सामनेवाला याची अर्जदार क्र. २ व ३ यांना सांभाळण्याची जबाबदारी असताना सामनेवाला यांनी ती जबाबदारी पार पाडलेली नाही . अर्जदार क्र.१ हिचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्रावरुन तिचे कर्जाचे हप्ते व इतर वजावटी होता रक्कम रु. २६,१४२/– इतके मासिक उत्पन्न मिळते, असे दिसून येते.

सामनेवाला यास निश्चित किती उत्पन्न मिळते, याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर नसला तरी देखील सामनेवाला याने त्याचे म्हणणे नि .१२ वर कथन केलेप्रमाणे त्यास दरमहा रक्कम रु.६०,०००/- इतका पगार आहे, असे दिसून येते. अर्जदार क्र. २ व ३ यांचे पालनपोषणाची जबाबदारी ही अर्जदार क्र. १ सामनेवाला या दोघांचीही आहे. सामनेवाला व अर्जदार क्र.१ यांचे उत्पन्न, त्यांचे राहणीमान, दोघांच्यावर असलेली जबाबदारी, जीवनावश्यक वस्तुंची वाढती महागाई, याचा सारासार विचार करता सामनेवाला याने अर्जदार क्र. २ व ३ यांना पोटगी करिता प्रत्येकी रुपये ५,०००/- प्रति महिना अशी अंतरिम पोटगी मंजूर करणे न्यायोचित होईल, या निष्कर्षापर्यंत मी आले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - <u>आदेश</u> -

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यास असे आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार नं.२ हिस रक्कम रु.५,०००/- व अर्जदार क्र.३ हिस रक्कम रु. ५,०००/- प्रतिमहिना अंतरिम पोटगी या आदेशापासून अंतिम निर्णयापर्यंत अगर पुढील आदेश होईपर्यंत द्यावेत.

३ या अर्जाचा खर्च रक्कम रुपये २००० /- (रुपये दोन हजार मात्र) इतका सामनेवाला याने अर्जदार यांना द्यावा.

४. या आदेशाची प्रत अर्जदार क्र .१ व सामनेवाला यांना मोफत द्यावयाची आहे.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2022.07.29 12:16:19 +0530

कुडाळ. (अ. जो. बाचुळकर )
दिनांकः-२८/०७/२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
कुडाळ.